दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/२६/२०१९
दि.२०/०३/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.गणेश अ. मिस्त्री, ...............अपिलार्थी
शॉप क्र.२, कंचन गंगा बिल्डींग,
क्रॉस गार्डन, भाईंदर (प.)

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
उप-व्यवस्थापक (परिवहन)

## -: विवेचन :-

श्री.गणेश अ. मिस्त्री यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) यांचेकडे दि.१८/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) एकुण परिवहन मध्ये बसची संख्या किती आहे, किती बस चालू आहेत. किती बस गोडाऊन मध्ये उभ्या आहेत. तसेच बसचालक यांचे बिल्ला, वाहन चालवण्याचा परवाना, फिटनेस प्रमाणपत्र, इन्शुरन्स, सर्व बसचे आर.सी.बुक माहिती सत्यप्रत करुन मिळावीत.

२) परिवहन विभागाचा बसचा ठेका कोणत्या कंपनीला दिला आहे, त्याच्या सोबत झालेला महापालिकेचा करारनामा, मा.महापालिकेचा ठराव, सर्व कागदपत्रे सत्यप्रत करुन मिळावीत.

३) तसेच संबंधित विषयातील इतर सर्व कागदपत्रे सत्यप्रत करुन मिळावीत. त्यासाठी आपल्या कार्यालयाकडून आकारण्यात येणारे शुल्क भरणा करण्याची माझी तयारी आहे.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत अपेक्षिलेली माहिती देण्यात आली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.०२/०३/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२०/०३/२०१९ रोजी दुपारी ०३.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.परिवहन/३३/२०१९ दि.०७/०३/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०१९ बाबत जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे सायं.०४.०० वाजता मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन) हे बैठकीस

Scanned by CamScanner

उपस्थित राहणार असल्याने सदरची सुनावणी दि.२०/०३/२०१९ रोजी दुपारी १२.१० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.परिवहन/३९/२०१९ दि.१९/०३/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन), व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१८/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार अपेक्षिलेली माहिती देण्यात आलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना आज दि.२०/०३/२०१९ रोजी हस्ते माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) यांनी अपिलार्थी अर्जदारास आज दि.२०/०३/२०१९ रोजी हस्ते माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच याव्यतिरिक्त माहिती हवी असल्यास ती विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (परिवहन)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

O/C

**प्रति:-**

१) श्री.गणेश अ. मिस्त्री,
शॉप क्र.२, कंचन गंगा बिल्डींग,
क्रॉस गार्डन, भाईंदर (प.)

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-व्यवस्थापक (परिवहन)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परिवहन) यांचे कार्यालय.

दिनांक:- 20/3/2019
पोच:-
परिवहन उपक्रम
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Scanned by CamScanner